14-06-2025-Dai-01_DH_PAN_01_04_2016-1.qxp 6/13/2025 10:12 PM Page 1


आपलं, आपल्यासाठी, सर्वांसाठी

# दैनिक हेराल्ड

www.dainikherald.com




फोंडयात मुसळधार पावसामुळे भूस्खलन

पान ३ वर



ऑस्ट्रेलियाची २१८ धावांची आघाडी

पान ४ वर

वेर्णा, शनिवार, १४ जून २०२५ I पाने ४ I ₹ ४ | REG. NO. G2/RNP/GOA/101/2021-23 | Volume 13, Issue 282 | Verna, | facebook.com/dainikherald | Saturday 14 June 2025 | Pages 4 | ₹ 4

## निवडक

### मध्य पूर्व आशियात युद्ध होण्याची शक्यता

**नवी दिल्ली, दि. १३ :** मध्य पूर्व आशियात युद्ध सुरू होण्याची शक्यता आहे. अमेरिका आणि इराणमधील अणुकराराला विलंब होत असताना, इस्रायलने इराणवर मोठा हल्ला केला. इस्रायलने पहाटे इराणचे ४ अणु आणि २ लष्करी तळ उद्ध्वस्त केले आहेत. या हल्ल्यात अनेक इराणी लष्करी अधिकारी आणि अणुशास्त्रज्ञांचाही मृत्यू झाला असल्याची माहिती समोर आली आहे. त्यानंतर आता अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनीही इराणला मोठी धमकी दिली आहे. ट्रम्प यांनी काय म्हटलं ते जाणून घेऊयात.

इस्रायलने इराणवर केलेल्या हल्ल्यानंतर इराणनेही बदला घेण्याची घोषणा केली आहे. अशातच अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी अणुकराराबद्दल मोठे विधान केले आहे. ट्रम्प यांनी इराणला सांगितले की, इस्रायलकडे अनेक धोकादायक शस्त्रे आहेत. इराणमध्ये कराराला विरोध करणारे सर्व मारले गेले. इराणकडे अजूनही संधी आहे. आता करार करा नाहीतर अन्यथा आणखी विनाश होईल.

-----------------

### इस्रायलचा इराणवर हल्ला

जेरुसालेम, दि. १३ : इस्रायलवर प्रत्युत्तर म्हणून इराणने १०० हून अधिक ड्रोन डागले आहेत. इस्रायल डिफेन्स फोर्सेस (आयडीएफ) ने म्हटले आहे की हे ड्रोन पुढील १ ते २ तासांत इस्रायलपर्यंत पोहोचू शकतात. सध्या हे ड्रोन इराक आणि जॉर्डनच्या हवाई हद्दीत आहेत. जॉर्डनची राजधानी अम्मानमध्ये सायरन वाजू लागले आहेत. टाईम्स ऑफ इस्रायलच्या मते, आयडीएफने इशारा दिला आहे की इराण लवकरच मोठा क्षेपणास्त्र हल्ला करू शकतो. आज सकाळी इस्रायलने २०० लढाऊ विमानांनी इराणवर हल्ला केला. न्यू यॉर्क टाईम्सच्या मते, इस्रायली सैन्याने तेहरानभोवती किमान ६ लष्करी तळांना लक्ष्य केले आहे. या ६ पैकी ४ ठिकाणी अणु तळ देखील आहेत. इस्रायली सैन्य (आयडीएफ) म्हणते की इराणने इस्रायलवर किमान १०० ड्रोनने हल्ला केला आहे, परंतु त्यांची लढाऊ विमाने इस्रायली सीमेबाहेर त्यांना पाडत आहेत.

# ओला-उबर कंपन्यांना गोव्यात बंदी

■ टीम दैनिक हेराल्ड :

▶ कॅब ॲग्रिगेटर धोरणाबाबत सर्व घटकांचा विचार करूनच निर्णय घेणार : मुख्यमंत्री

**पणजी, दि. १३ : राज्यातील वादग्रस्त कॅब ॲग्रिगेटर धोरणावर सुरू असलेल्या वादळात मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांनी शुक्रवारी स्पष्ट भूमिका घेत,या विषयावर कोणताही निर्णय सर्व संबंधित घटकांना विश्वासात घेऊनच घेतला जाईल, असे स्पष्ट केले. यासोबतच, ओला किंवा उबर हे कॅब ॲग्रिगेटर गोव्यात येत नसल्याचेही त्यांनी ठामपणे सांगितले.**


मंत्रालयात पत्रकारांशी बोलताना मुख्यमंत्र्यांनी सांगितले की ,ओला-उबर गोव्यात येत नाहीत, याबाबत कुणीही संभ्रमात राहू नये. हा विषय केवळ मार्गदर्शक तत्त्वे तयार करण्याचा आहे. टॅक्सी संघटना व इतर संबंधित पक्षांच्या सूचना व मतांचा विचार करूनच पुढील निर्णय घेतला जाईल.



या पार्श्वभूमीवर मांद्रेचे आमदार जीत आरोलकर आणि कळंगुटचे आमदार मायकल लोबो यांनी सकाळी मंत्रालयात जाऊन मुख्यमंत्र्यांची भेट घेतली. त्यांनी कॅब ॲग्रिगेटर संदर्भात चर्चा केली असली तरी त्यांच्या नेमक्या मागण्या स्पष्ट झालेल्या नाहीत. मात्र माध्यमांशी बोलताना दोघांनीही मुख्यमंत्र्यांनी आमचे म्हणणे समजून घेतले, असे सांगितले.

आमदार आरोलकर यांनी स्पष्ट केले की, मांद्रेतील स्थानिक टॅक्सी व्यावसायिक कॅब ॲग्रिगेटरच्या संभाव्य आगमनामुळे चिंतेत आहेत. त्यांच्या संभ्रमाचे निरसन करण्यासाठी मी त्यांच्यासोबत मुख्यमंत्र्यांची भेट घेतली. मुख्यमंत्री म्हणाले की स्थानिक टॅक्सी व ॲग्रिगेटर टॅक्सींचे भाडेदर सारखेच राहतील आणि या माध्यमातून एक शिस्तबद्ध प्रणाली उभी राहील.

पान २ ▶



# अहमदाबाद विमान दुर्घटना : ब्लॅक बॉक्स सापडला

## एकमेव बचावलेला प्रवासी अद्याप हादरलेला, महाराष्ट्रातील अनेक क्रू सदस्यांचा मृत्यू | पंतप्रधानांची भेट

**अहमदाबाद, दि. १३ :**

अहमदाबाद येथे शुक्रवारी घडलेल्या एअर इंडियाच्या भीषण विमान अपघातात २४२ पैकी २४१ जणांचा मृत्यू झाला असून केवळ एक प्रवासी बचावला आहे. दरम्यान, दुर्घटनाग्रस्त विमानाचा 'ब्लॅक बॉक्स' सापडला असून अपघाताच्या तपासात यामुळे महत्त्वपूर्ण मदत होणार आहे.

नागरी विमान वाहतूक मंत्री राम मोहन नायडू किंजरापू यांनी माहिती दिली की, अपघात तपास विभागाने अपघातस्थळावरून २८ तासांत 'फ्लाइट डेटा रेकॉर्डर' (ब्लॅक बॉक्स) हस्तगत केला. ही तपासातील एक महत्त्वाची पायरी आहे, असे त्यांनी 'एक्स' (पूर्वीचे ट्विटर) वर पोस्ट करताना नमूद केले.

ब्लॅक बॉक्समध्ये दोन उपकरणे असतात – एक कॉम्प्युटर 'व्हॉईस रेकॉर्डर' जो वैमानिकांचे संभाषण व कॉकपिटमधील आवाज टिपतो, आणि दुसरा फ्लाइट डेटा रेकॉर्डर' जो विमानाच्या उड्डाणाशी संबंधित माहिती साठवतो.

**फक्त एक प्रवासी बचावला : विश्वास कुमार रमेश**

या भीषण अपघातातून वाचलेले एकमेव प्रवासी, ब्रिटनचे नागरिक विश्वास कुमार रमेश, सध्या अहमदाबादच्या सिव्हिल हॉस्पिटलमध्ये उपचार घेत आहेत. मी कसा वाचलो यावर अजूनही विश्वास बसत नाही, असे डीडी न्यूजशी बोलताना त्यांनी सांगितले. रमेश हे ११-अ सीटकडे बसले होते, जे विमानाच्या त्या भागात होते जो हॉस्टेल इमारतीला लागलेला नव्हता.



दरवाजा तुटलेला असल्यामुळे त्यांनी एका छोट्या जागेतून बाहेर पडण्याचा प्रयत्न केला आणि वाचले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी स्वतः हॉस्पिटलमध्ये रमेश यांची भेट घेतली.

कॅप्टन सभरवाल यांचा अपघाती अंत

विमानाचे मुख्य वैमानिक कॅप्टन सुमित सभरवाल यांचा मृत्यू झाला असून, त्यांना तीन दशकांचा उड्डाणाचा अनुभव होता. ८२०० तासांहून अधिकच्या फ्लाईट अनुभवासह ते लाईन ट्रेनिंग कॅप्टन' होते. लवकरच निवृत्त होण्याच्या तयारीत असलेले सभरवाल हे खूपच शिस्तबद्ध आणि शांत स्वभावाचे होते, असे त्यांच्या मुंबईतील शेजाऱ्यांनी सांगितले.

**फर्स्ट ऑफिसर क्लाइव्ह कुंदर यांचा मृत्यू**

सभरवाल यांच्यासोबत फर्स्ट ऑफिसर क्लाइव्ह कुंदर हेही अपघातात मरण पावले. त्यांचा सुमारे १,१०० तासांचा उड्डाणाचा अनुभव होता आणि ते ड्रीमलायनर उडवण्यासाठी प्रमाणित होते.

**महाराष्ट्रातील केबिन क्रू मेंबर्सचाही मृत्यू**

या दुर्घटनेतील मृतांमध्ये महाराष्ट्रातील अनेक केबिन क्रू सदस्यांचा समावेश आहे :

मैथिली पाटील – पनवेलजवळील न्हावा गावची रहिवासी, दोन वर्षांपूर्वी एअर इंडियामध्ये केबिन क्रू म्हणून दाखल झालेली. हलाखीच्या परिस्थितीत वाढलेली मैथिली लहानपणापासून हवाई सुंदरी बनण्याचे स्वप्न बघत होती.

दीपक पाठक – बदलापूरचे रहिवासी आणि एअर इंडियात गेल्या ११ वर्षांपासून कार्यरत. अपघाताआधी कुटुंबाशी फोनवर संवाद साधल्याचा उल्लेख नातेवाईकांनी केला.

रोशनी सोनघरे – डोंबिवलीच्या २७ वर्षीय केबिन क्रू मेंबर, ज्यांचा मृत्यू झाल्याची माहिती त्याच्या आईला अद्याप देण्यात आलेली नाही.

पान २ ▶